प्रशासकीय मान्यता

नव्याने सुरु होणाऱ्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जळगांव येथील ५०० खाटांच्या रुग्णालयाच्या इमारतीचे बांधकाम. (जी+६)

महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,

शासन निर्णय क्रमांक : जीसीजे-२०१७/प्र.क्र.३२६/प्रशा-१

गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, नवीन मंत्रालय,
९ वा मजला, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई - ४०० ००१.
दिनांक : १० मे, २०१८.

वाचा :

१) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय, क्रमांक: एमईडी २०१६/प्र.क्र.१८५/१६/शिक्षण १, दि.११.०५.२०१७.
२) संचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे क्रमांक: संवैशिवसं/नविन शावैम जळगांव/बांधकाम/१७४८१/प(आय)/१७,१०६१५, दि.०७.०९.२०१७.
३) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय, क्रमांक: पीएमसी-२०१७/१११५/प्र.क्र.४२३(अ)/प्रशा-१,दिनांक ०८.०२.२०१८.
४) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय, क्रमांक: पीएमसी-२०१७/१११५/प्र.क्र.४२३(क)/प्रशा-१, दि.०८.०२.२०१८.

शासन निर्णय :-

उपरोक्त संदर्भाधीन दिनांक ११.०५.२०१७ च्या शासन नुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जळगांव येथील ५०० खाटांच्या रुग्णालयाच्या इमारतीचे बांधकामास खालील तक्त्यात दर्शविलेल्या व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सहमतीने व सचिव समितीच्या मान्यतेच्या अनुषंगाने एकूण रुपये १९१९०.२४ लक्ष (रुपये एकशे एक्याण्णोव कोटी नव्वद लक्ष चोवीस हजार फक्त) इतक्या खर्चाच्या अंदाजपत्रकास खालील बाबींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

(रुपये लाखामध्ये)

अ. क्र.	स्थापत्य दुरुस्ती बांधकामाचे नाव	प्रस्तावित केलेली अंदाजित रक्कम रुपये	सचिव समितीने सहमती दर्शविलेली किंमत रुपये
१	नव्याने सुरु होणाऱ्या शासकीय वैद्यकीय	२०८७९.००	१९१९०.२४

अ. क्र.	स्थापत्य दुरुस्ती बांधकामाचे नाव	प्रस्तावित केलेली अंदाजित रक्कम रुपये	सचिव समितीने सहमती दर्शविलेली किंमत रुपये
	महाविद्यालय व रुग्णालय, जळगांव येथील ५०० खाटांच्या रुग्णालयाच्या इमारतीचे बांधकाम. (जी+६)		
	एकूण	**२०८७९.००**	**१९१९०.२४**

१. सदर प्रकरणी उपरोक्त वाचा मध्ये संदर्भ क्रमांक ३ मध्ये नमूद शासन निर्णय दि.०८.०२.२०१८ मधील तरतुदीतील पर्यायानुसार उपरोक्त बांधकाम अन्य दुसऱ्या कंपन्यांकडून दर मागवून विहीत शासकीय प्रक्रिया पार पाडून टर्न की तत्त्वावर, शासन निर्णय, क्रमांक: पीएमसी-२०१७/१११५/प्र.क्र.४२३(क)/प्रशा-१, दि.०८.०२.२०१८ अन्वये गठीत केलेल्या समितीमार्फत करुन घेण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. सदर बांधकामाकरीता टर्न की तत्वावर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (Project Management Consultant) ची नेमणूक करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने याबाबतच्या प्रचलित नियम व कार्यपध्दतीनुसार स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया राबविण्याबाबत कार्यवाही करावी.

३. सदर प्रकरणी जळगांव येथील उपरोक्त बांधकामासाठी टर्न की तत्वावर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार निवड करण्यास प्रचलीत नियम व कार्यपध्दतीनुसार स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया राबविण्यासाठी खालीलप्रमाणे निवड समिती गठीत करण्यात येत आहे.

अ.क्र.	अधिकारी पदनाम	समितीतील पद
१.	मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक.	अध्यक्ष
२.	उपमुख्य वास्तुशास्त्रज्ञ, नाशिक	सदस्य
३.	अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जळगांव	सदस्य
४.	अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, जळगांव	सदस्य
५.	कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जळगांव	सदस्य सचिव

४. सदर समिती स्पर्धात्मक निविदेद्वारे निवड करण्यात आलेल्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराच्या नेमणूकीबाबतची शिफारस शासनाकडे करील. तद्नंतर याबाबत शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, क्रमांक: पीएमसी-२०१७/१११५/प्र.क्र.४२३(क)/प्रशा-१,

दि.०८.०२.२०१८ अन्वये अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीसमोर ठेवून त्यास मान्यता देण्यासंदर्भात पुढील कार्यवाही शासनस्तरावर करण्यात येईल.

५. सदरहू प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार हे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, जळगांव येथील या शासन निर्णयाद्वारे प्रशासकीय मान्यता दिलेल्या बांधकाम व यापुढील संपूर्ण बांधकाम प्रकल्पाचे, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून काम पाहतील.

६. काम सुरु करण्यापूर्वी नियोजित जागा उपभोक्ता विभागाच्या ताब्यात असल्याचे तसेच जागेच्या मालकी हक्काबाबतची पूर्तता करुन घ्यावी.

७. सदर कामासाठी जागेची उपलब्धता, जागा पुरेशी आहे किंवा नाही, याबाबतची खात्री संबंधीत संस्था प्रमुखांनी करावी.

८. सदर कामासाठी निविदा मागविण्याआधी सार्वजनिक बांधकाम विभागातील सक्षम अभियंता/अधिकाऱ्यांची तांत्रिक मंजुरी घेणे आवश्यक राहील.

२. सदर कामासाठी पुढील लेखाशीर्षाअंतर्गत निधीमधून करण्यात येईल. निधीची तरतूद झाल्यानंतर प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात येईल.

मागणी क्रमांक - एच-८

४२१० - वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च

०३, वैद्यकीय शिक्षण, प्रशिक्षण व संशोधन,

१०५-विषमचिकित्सा पंचवार्षिक योजनांतर्गत

(४२१० ००४१) ५३- मोठी बांधकामे

३. हा शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, दिनांक १७ एप्रिल, २०१५ अन्वये वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग पहिला - उप विभाग पाच मधील महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका अंतर्गत परिच्छेदांखाली प्रदान करण्यात आलेले वित्तीय अधिकार मधील अ.क्र.१, परिच्छेद क्रमांक १३४ अन्वये प्रशासकीय विभागाला प्रदान केलेल्या अधिकारानुसार व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ४२१/इमा-३, दि.२७.०९.२०१७ अन्वये मिळालेल्या सहमतीच्या अनुषंगाने तसेच सचिव समितीने दि.२०.०३.२०१८ रोजीच्या बैठकीत दिलेल्या सहमतीच्या अनुषंगाने तसेच शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, क्रमांक: पीएमसी-२०१७/१११५/प्र.क्र.४२३(अ)/प्रशा-१, दि.०८.०२.२०१८ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक **२०१८०५१०१३१३२६२४१३** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Prakash Babanrao Surwase

Digitally signed by Prakash Babanrao Surwase
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Medical Education and Drugs Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=eb1adbd5d5d31cf6d91c86149c955a6822b4fea3e4ec334c18e2c6f96cc5301b, cn=Prakash Babanrao Surwase
Date: 2018.05.10 13:54:38 +05'30'

(प्रकाश सुरवसे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा), नागपूर, महाराष्ट्र.
२. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. प्रधान सचिव तथा विधी परामर्श, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक विभाग, नाशिक.
७. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
८. उपमुख्य वास्तुशास्त्रज्ञ, नाशिक.
९. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, जळगांव.
१०. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,जळगांव.
११. कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, जळगांव.
१२. मा.मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
१३. सार्वजनिक बांधकाम विभाग, (इमारत-३) मंत्रालय, मुंबई.
१४. जिल्हा कोषागार अधिकारी, जळगांव.
१५. निवडनस्ती (प्रशा-१).